**ठळक बातम्या**

- भारत आणि न्यूझीलंडमध्ये आज मुक्त व्यापार करार होणार
- आपच्या ७ खासदारांच्या भाजपा प्रवेशाला राज्यसभा अध्यक्षांची मंजुरी
- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची आज सांगता

आणि

- पश्चिम आशियातल्या युद्धात आतापर्यंत ६ हजार जणांचा मृत्यू

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज दिल्लीत मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या होणार आहेत. उभय देशांतील आर्थिक हितसंबंधाना बळकटी मिळण्याच्या दृष्टीने उचललेलं हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. न्यूझीलंडच्या व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टॉड मॅकक्ले यांनी काल आग्रा इथं ताजमहालला भेट दिली. त्यावेळी गोयल यांनी ही माहिती दिली. अनेक वर्षांच्या उच्चस्तरीय चर्चांनंतर या कराराला अंतिम स्वरूप देण्यात आलं असून, दोन्ही नेत्यांच्या उपस्थितीत यावर स्वाक्षऱ्या होतील अशी असं गोयल म्हणाले. येत्या पाच वर्षांच्या काळात द्विपक्षीय व्यापार पाच अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचं या कराराचे उद्दिष्ट आहे. या कराराच्या वैशिष्ट्यांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - व्हाइस कास्ट - - -**

*(दोन्ही देशांमध्ये मुक्त व्यापार कराराच्या चर्चा २०१० मध्ये सुरू झाल्या होत्या. चर्चेच्या नऊ फेऱ्या झाल्यावर २०१५ मध्ये या चर्चा स्थगित झाल्या होत्या, पण मार्च २०२५ पुन्हा या चर्चांना सुरुवात झाली. देशातले शेतकरी आणि सूक्ष्म-मध्यम-लघु उद्योगाच्या हितांचं रक्षण करण्यासाठी दुग्धजन्य उत्पादनं, मांस, कांदा, मका, हरभरे, बदाम, साखर यासारख्या वस्तू या करारात समाविष्ट नाहीत. शस्त्रं, दाग-दागिने, तांब्याच्या वस्तू यांचाही यात समावेश नाही.*

*वस्त्रोद्योग, प्लास्टिक, चामडं, अभियांत्रिकी क्षेत्रातली भारतीय उत्पादनं आता करमुक्त होतील. यावर आधी सरासरी २ पूर्णांक ३ दशांश टक्के कर होता. येत्या १५ वर्षात न्यूझीलंड भारतात २० अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक करणार आहे. या करारांअंतर्गत ५ हजार भारतीयांना न्यूझीलंडमध्ये रोजगारासाठी तात्पुरता विसा मिळेल आणि ३ वर्षांसाठी राहता येईल.*

*या करारामुळं न्यूझीलंडच्या भारतात निर्यात होणाऱ्या ५४ टक्क्यांहून अधिक वस्तू करमुक्त होतील. त्यात मांस, लोकर, कोळसा आणि इतर वस्तूंचा समावेश आहे. याशिवाय सफरचंद, किवि, मध यासारख्या वस्तूंच्या आयातीवर सवलत मिळेल आणि आयातीची किमान किंमत निश्चित केली जाईल. लोह, स्टील, भंगारातले ॲल्युमिनियम यासारख्या वस्तूंवर आकारला जाणार कर १० वर्षांसाठी माफ केला जाईल.)*

**<><><><>**

आपच्या ७ खासदारांचा भाजपामध्ये प्रवेशाचा अर्ज राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी मंजूर केला आहे. त्यामुळं राज्यसभेतल्या भाजपाच्या खासदारांची संख्या ११३ झाली असून आपचे ३ खासदार उरले आहेत. राघव चड्ढा, अशोक मित्तल, हरभजन सिंग, संदीप पाठक, विक्रमजित साहनी, स्वाती मालिवाल आणि राजींदर गुप्ता यांनी शुक्रवारी भाजपा प्रवेशाचा निर्णय जाहीर केला होता. त्याला रविवारी आपने आक्षेप घेऊन त्यांचं सदस्यत्व रद्द करण्याची मागणी केली होती.

**<><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यासाठीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार आहे. या टप्प्यात १४२ मतदारसंघांमध्ये येत्या २९ तारखेला मतदान होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह अनेक नेते आज प्रचार सभा, रोड शो घेत आहेत.

याआधी, २३ एप्रिल रोजी झालेल्या पहिल्या टप्प्यात विक्रमी ९३ पूर्णांक १९ टक्के मतदानाची नोंद झाली होती. केरळ, आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू या चार राज्यांसह पुदुच्चेरी या केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकांची तसंच महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकांची मतमोजणी येत्या ४ मे रोजी होणार आहे.

**<><><><>**

मध्य प्रदेशातील नर्मदापुरम इथं एक एसयूव्ही कार आणि ट्रॅक्टर यांची धडक होऊन झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला तर सात जण जखमी झाले. हा अपघात आज पहाटे तवा नदीवरच्या पुलाजवळ अंचलखेडा इथं झाला. हे सर्व लोक सेहोर जिल्ह्यातल्या बुधनी तालुक्यामधील माना गावातून परत येत होते, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

<><><><>

ईडी अर्थात अंमलबजावणी संचालनालयाने पंजाबमधल्या चंदीगड, लुधियाना, पटियाला, नाभा आणि जालंधरसह एकूण अकरा ठिकाणी छापेमारी केली आहे. ईडीने दिलेल्या माहितीनुसार, एका फौजदारी खटल्याचा निपटारा करण्यासाठी लाचेची मागणी केल्याच्या आरोपांखाली, चंदीगडच्या सीबीआय आणि एसीबी यांनी नोंदवलेल्या मूळ गुन्ह्यांच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. गुन्ह्यातून मिळवलेला आर्थिक लाभ शोधून काढणे, उघड न केलेली मालमत्ता ओळखणं आणि मनी लाँड्रिंगशी संबंधित पुरावे गोळा करणं, हा या कारवाईचा उद्देश असल्याचं अंमलबजावणी संचालनालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><>

पश्चिम आशियात युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत इराणमधे ३ हजार ३७५ जण तर लेबनॉनमधे २ हजार ५०९ असे जवळपास सहा हजार जण मृत्युमुखी पडले आहेत. इस्त्रायलमधे २३ आणि अरब देशांमधे बारापेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे. लेबननमधे १५ इस्त्रायली जवान, १३ अमेरिकन जवान आणि सहा संयुक्त राष्ट्राच्या शांतता सैनिकांचाही या युद्धात मृत्यू झाला आहे. दरम्यान, इस्त्रायल आणि हिजबोला यांच्यातल्या शस्त्रसंधीची मुदत तीन आठवड्यांसाठी वाढवण्यात आली आहे.

युद्धाला दोन महिने उलटले असून होर्मुझची सामुद्रधुनी बंद असल्यामुळे याचा जागतिक अर्थव्यवस्थेवर होत आहे. दोन्ही बाजूंनी आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. अमेरिकेने बंदरांवरची नाकेबंदी उठवली नाही तर इराण चोख प्रत्यूत्तर देईल असा इशारा इराणच्या लष्करानं दिला आहे. ज्या बोटी जलमार्गात सुरूंग पेरतील अशी शक्यता आहे त्यांना नष्ट करा असा इशारा ट्रम्प यांनी गेल्या आठवड्यात दिला आहे.

**दरम्यान,** अणुकार्यक्रम न थांबवता इराण होर्मुझच्या सामुद्रधुनीचा मार्ग मोकळा करायला तयार असून अमेरिकेनं बंदरावरली नाकेबंदी उठवावी अशी मागणी इराणने केल्याचं

दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर माध्यमांना सांगितलं आहे. पाकिस्तानद्वारे पाठवलेला हा प्रस्ताव डोनाल्ड ट्रम्प नाकारतील अशी शक्यता वर्तवली जात आहे.

अमेरिकेसोबतच्या शस्त्रसंधीच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अरागची यांनी काल पाकिस्तानला भेट दिली. मात्र ते काल रात्रीच परतल्यामुळे चर्चेच्या दुसऱ्या फेरीबद्दल संभ्रम निर्माण झाल्याचं बोललं जात आहे. तर आपली पाकिस्तान भेट फलदायी ठरली असून इराण आणि अमेरिका यांच्यातल्या वाटाघाटीसंदर्भात पाकिस्तानच्या सर्वोच्च नेत्यांशी चांगली चर्चा झाल्याचं अरागची यांनी सांगितलं. अरागची आज सकाळी रशियात सेंट पीटर्सबर्ग इथं पोहोचले, तिथं त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. वाटाघाटींची चर्चा कोणत्या दिशेने पुढे जाऊ शकते याबद्दल पाकिस्तानच्या नेत्यांसोबत चर्चा झाल्याचं अरागची म्हणाले. दरम्यान रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन हे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अरागची यांची भेट घेतील असं क्रिमलीनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव यांनी सांगितलं.

दुसरीकडे चर्चेसाठी स्टिव विटकॉफ आणि जेरेड कुशनर यांना इस्लामाबादला पाठवलं जाईल, असं अमेरिकेनं गेल्या आठवड्यात सांगितलं होतं. मात्र इराणसोबतच्या वाटाघाटींमधे काहीच प्रगती होत नसल्याने हा निर्णय रद्द केल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं. इराणला चर्चा करायची असेल तर आपण तयार आहोत मात्र आपले प्रतिनिधी पाठवणार नाही असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात कालवैशाखी वादळामुळे सात जिल्ह्यांमध्ये वीज पडून १४ लोकांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले आहेत. 'गाईबांधा' जिल्ह्यात पाच लोकांचा मृत्यू झाला असून, सिराजगंज, जमालपूर, ठाकूरगाव जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी दोन जणांचा मृत्यू झाला तर बोगुरा, नाटोर आणि पंचग मध्ये प्रत्येकी एका व्यक्तीचा मृत्यू झाला. बांगलादेश हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, येत्या काही दिवसांत देशाच्या विविध भागांत तुरळक पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

माली या देशाचे संरक्षण मंत्री सादियो कमारा यांचा काल त्यांच्या निवासस्थानी एका आत्मघातकी स्फोटात मृत्यू झाला. स्फोटकांनी भरलेला एक ट्रक कमारा यांच्या निवासस्थानी जाऊन धडकल्यामुळे झालेल्या स्फोटात कमारा मृत्युमुखी पडल्याचं माली सरकारचे प्रवक्ते इसा उस्मान कोलिबली यांनी एका निवेदनाद्वारे सांगितलं.

<><><><><>

इजिप्तमध्ये कैरो इथे सुरु असलेल्या ISSF ज्युनिअर वर्ल्ड कप २०२६ मध्ये भारतीय नेमबाजांनी सोळा पदकं पटकावली आहेत. यामध्ये पाच सुवर्ण, सहा रौप्य आणि पाच कांस्य पदकांचा समावेश आहे. पन्नास मीटर रायफल थ्री पोझिशन मध्ये हेमंत बर्मनने रौप्य पदकाची कमाई केली तर संमिश्र प्रकारात झुहैर खान आणि आद्या कट्याल यांनी कांस्य पदक घेतलं.

//<><><><><>//